रामटेक तिर्थक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत अंबाळा तलाव परिसरातील चामार घाट, शिवमंदिर क्र.८ व १७, गंगासुत्र मंदिर जतन दुरूस्ती या कामाच्या ब-१ निविदेस मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्रमांक : स्मारक २०१९/प्र.क्र.३९/सां.का.३
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : - ०६ मार्च, २०१९.

वाचा :- १) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.एमयुएन २०१८/प्र.क्र.२९९/नवि-१८, दि.२१.०५.२०१८
२) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.एमयुएन २०१८/प्र.क्र.२९९/नवि-१८, दि.२७.०९.२०१८
३) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्रमांक रासंस्मा २०१८/प्र.क्र.१२३/ सां.का.३, दिनांक ०७.०१२.२०१८
४) संचालक पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय मुंबई यांचे जा.क्र.स्मारके/ २०१९ /३१६, दिनांक १३.०२.२०१९ चे पत्र .

प्रस्तावना :-

नागपूर जिल्ह्यातील रामटेक या तिर्थक्षेत्राचा विकास करण्यासाठी, येथील ऐतिहासिक स्मारकांचा आणि परिसराचा विकास करण्यासाठी रु. १५० कोटी इतक्या रकमेच्या विकास आराखड्यास मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील शिखर समितीने दि. १४.०७.२०१७ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार संदर्भाधीन क्र.१ च्या शासन निर्णयान्वये नगर विकास विभागाने पहिल्या टप्यात रु. ४९.२८ कोटी रकमेच्या कामांना मान्यता दिली आहे. या योजनेत पुरातत्व विभागाने करावयाच्या रु.१८.४३ कोटी रकमेंच्या कामांचा समावेश आहे. संदर्भाधीन क्र.२ च्या शासन निर्णयान्वये नगर विकास विभागाने पहिल्या टप्यातील कामांसाठी रु.७.०० कोटी इतका निधी जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडे सुपूर्द केला आहे. रामटेक तिर्थक्षेत्र विकास आराखड्याच्या कामांचे समन्वयन व संनियंत्रण करण्याची जबाबदारी तसेच सदर आराखड्यासाठी सहायक अनुदान संबंधित अंमलबजावणी यंत्रणांना वितरीत करण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी, नागपूर यांच्याकडे सोपविण्यात आले आहे. पुरातत्व विभागामार्फत करण्यात येणाऱ्या कामांकरिता आवश्यक निधी कामांच्या प्रगतीनुसार जिल्हाधिकारी, नागपूर यांच्याकडून सहाय्यक संचालक, पुरातत्व विभाग, नागपूर यांचेकडे संगणक प्रणालीवर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. मंजूर आराखड्यानूसार या कामाच्या अंदाजपत्रकास संदर्भाधीन क्र.३ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर कामाची निविदा कार्यवाही पुर्ण करुन न्युनतम निविदेचा प्रस्ताव संचालकांनी संदर्भ क्रमांक ४ च्या पत्राव्दारे शासन मान्यतेस सादर केला आहे. सदर न्युनतम निविदेच्या प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास अनुसरुन शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय :-

रामटेक तिर्थक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत अंबाळा तलाव परिसरातील चामार घाट, शिवमंदिर क्र.८ व १७, गंगासुत्र मंदिर जतन दुरूस्ती या कामाकरीता संचालकांकडून प्राप्त खालील न्युनतम निविदेस या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

निविदाकराचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम रुपये	निविदा रक्कम रुपये	अभिप्राय
राज कन्स्ट्रक्शन, लाखणी, जि.भंडारा	रु.४,९४,०१,३६०/-	रू.४,६५,०७,५५६/-	यांची निविदा ४.११ % अधिक दराची प्रथम क्रमांकाची (L१) निविदा आहे. सदर निविदा रू.४,८४,१९,०१७/- इतक्या रक्कमेची होत आहे. त्यामुळे सदर निविदा मंजूर करण्यास हरकत नाही.

०२. सदर ऐतिहासिक राज्य संरक्षित स्मारकाचे जतन व दुरुस्तीची कामे ही विशिष्ट प्रकारची असून सदर कामे पुरातत्वशास्त्र संकेतानुसार करणे आवश्यक आहे. हे काम करण्यासाठी संचालक पुरातत्व यांनी सादर केलेल्या न्युनतम निविदेच्या प्रस्तावास महाराष्ट्र वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ चा भाग पहिला उपविभाग ५ मधील अ.क्र. ६ महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परिच्छेद क्रमांक २२० अन्वये प्रशासकीय विभागांना असलेल्या अधिकारानुसार मान्यता देण्यात येत आहे.

०३. संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय यांना यासाठी नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांना अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास या संबंधीच्या देयकावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

०४. हा शासन निर्णय विअप्र -२०१३/ प्र.क्र.३०/ २०१३/ विनियम, भाग २, दिनांक १७ एप्रिल, २०१५, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग पहिला उपविभाग तीन मधील अनुक्रमांक ४ मधील परिच्छेद क्र. २७(२) "अ" नुसार तसेच वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१८/ प्र.क्र.६९/ अर्थसंकल्प-,३ दिनांक २ एप्रिल, २०१८ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकाराच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहे.

०५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१९०३०६१५३६१६८५२३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Shailesh Tukaram Jadhav

Digitally signed by Shailesh Tukaram Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tourism And Cultural Affairs Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2f28af075ed91b64d12528e9ab00bb144f43fcf33c23ccf14c820b969f8ca273, serialNumber=a90555ec4a073187eb44ee0b1aa93e5c855afff34eedb4b03bb3e0a6cfd6271c, cn=Shailesh Tukaram Jadhav
Date: 2019.03.07 16:45:09 +05'30'

(शै.तु.जाधव)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक , पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. सहाय्यक संचालक, पुरातत्व विभाग, नागपूर
३. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (१ व २ लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/ नागपूर

४. महालेखाकार (स्थानिक निकाय लेखा परीक्षा व लेखा) मुंबई
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
६. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
७. जिल्हा कोषाधिकारी, नागपूर
८. अवर सचिव (अर्थसंकल्प) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
९. निवड नस्ती, सां.का.३